teacher told me that story. 21 What have they given you for your box? 22 Who gave you that news? 23 Has he forgotten your former faults? 24 I burnt my left leg in a hurry in fire. 25 His father had left him an estate worth Rs. 10,000, but he squandered it all. 26 The washerman has torn my new coat. 27 The wicked boys have caught the poor birds in their nests. 28 He has dishonestly made much money. 29 The enemy imprisoned the prince in the heat of anger. 30 The honest man has been assisted in his distress by many merchants in the city. 31 She never showed such a fortitude before.

१ तूं कोठें गेला होतास? २ गुरुजी, मी बाहेर गेलों होतों. ३ गोविंदा खालीं होता. ४ मी सर्व वेळ वरती पडत होतों. ५ गोविंदा मुलींसंगतीं खेळायास गेला होता. ६ तसा तूं कां गेला नाहींस (नाहीं गेलास)? ७ मी गेलों होतों, पण त्या माझ्याशीं चांगल्या वागल्या नाहींत. ८ कोणे एके दिवशीं द्वारकानाथभट्ट बाजाराचे रस्त्यानें चालला होता. ९ तेथें एक मोठी हवेली बांधीत होते. १० तें काम दुसरे मजल्यापर्यंत चढलें होतें. ११ त्यास परांच्या केल्या आहेत व त्यांवर शिड्या लावल्या आहेत. १२ बाबा! तीं माणसें कशाचा (कसचा) खेळ खेळत आहेत? १३ महादजी खोत बाहेर दरवाज्याशीं आला असेल. १४ मीं त्याशीं बोलणें वर्ज केलें आहे. १५ तूं आज्ञा पाळण्याचा डौल मात्र घातला आहेस. १६ तो कधीं कधीं (बधीं or मधीं) बापाची आज्ञा मोडीत असतो. १७ मी तुझे भावाचा काय अन्याय केला आहे? १८ आमचे बापास तुमचे बापाचा फार राग आला असेल. १९ आमचे बापानें आम्हांस तुमचें दर्शन घ्यावयाची (घ्यायची) किंवा तुम्हांशीं बोलावयाची मनाई केली आहे. २० आपला बाबा आणि आई चिंतेत पडलीं आहेत. २१ तुमचा बाबा आमचे बाबावर रागावला आहे. २२ आमचे आईला ती आंगठी विश्वासराव मामांनीं दिली असेल. २३ आम्ही सर्वांना सोडलें आणि तुझ्यामागून आलों आहों. २४ त्या खलाशांनीं गलबतें भरलीं आहेत. २५ जत्रेंत आम्हांला पुष्कळ मुलें भेटलीं होतीं. २६ तूं आपलीं पुस्तकें कोठें ठेविलीं होतींस? २७ मीं तुझाला पूर्वी कधीं पाहिलें नाहीं. २८ मुलांनीं आपले घडे चांगले तयार केले असतील. २९ त्यानें आपलें काम कालच संपविलें आहे. ३० त्या चोरानें ते दागिने आपल्या एका मित्राचे खोलींत लपविले होते. ३१ अद्याप त्याचें जेवण झालें नसेल. ३२ मीं असलें सुस्वर गाणें पूर्वी कधींच ऐकिलें नव्हतें (नवतें).

Digitized by Google

LESSON XXXIV.

The Future Tense.*

1. The future imperfect is made up of the present participle of the principal verb and the future tense of असणें; as, मी हरीच्या घरीं तुझी वाट पहात असेन I shall be waiting for you at Hari's.

2. It expresses an action in progress in the future time; as, आपण या वेळीं उद्यां वाट चालत असूं We shall be travelling to-morrow at this time.

3. It expresses probability or doubt in the present time; as, आमची आई आतां आमची वाट पहात असेल Our mother must (or might) be waiting for us now.

4. When the continuity of action is to be expressed emphatically, the verb बसणें is used instead of असणें; as, उद्यां मी सारा दिवस लिहीत बसेन I shall be writing the whole day to-morrow.

कीर्तन *n.* celebrating the praises of God with music and singing.
कोंकण *n.* the Konkan.
खचीत *ad.* for certain.
गंगा *f.* name of a woman.
बाळ्या *m.* name of a boy.
वाट/पहाणें *v. a.* to wait.
तयार*a*करणें *v. a.* to prepare.
नाश*m*करणें *v. a.* to destroy.
शिव्या/देणें *v. a.* to abuse.
सासरें *n.* the house of a woman's father-in-law.

1. You will be walking the whole day to-morrow. 2 We shall be writing our lessons at that time. 3 But what will you be doing? 4 Govinda will be doing that work in the afternoon. 5 My servant will be mowing grass for the next fifteen days. 6 They will be waiting for you in the library. 7 We shall be preparing our lessons at night. 8 Perhaps your guests are going to Satara with your father. 9 They must be abusing me. 10 Your cattle must be destroying the corn in the next field.

* See Appendix, Note 5.

Digitized by Google

१ उद्यां ह्या वेळीं आमच्या वर्गाची परीक्षा होत असेल. २ आपण आमच्या घरीं बुद्धळें खेळत बसूं. ३ आमचा बाळ्या पुढल्या वर्षी शाळेंत जात असेल. ४ तूं दोनप्रहरीं जेवीत असशील, नाहीं का? ५ आमचे इकडे लोक आतां भातें पेरीत असतील. ६ उद्यां एवढ्या वेळास गंगा आपल्या सासऱ्यां जात असेल. ७ आमच्या सासूबाई आतां काय करीत असतील बरें? ८ आजपासून आठ दिवसांनीं रामाच्या देवळांत हरिकीर्तन होत असेल. ९ हा पाऊस कोंकणांत खचीत पडत असेल. १० ते गृहस्थ तुझी त्या ठिकाणीं केव्हांची वाट पाहत बसले असतील. ११ असा आतां सर्व दिवस पाऊस पडत असेल का?

LESSONS XXXV.

The Prospective Tense.*

1. The future participle of a verb is formed by adding णार to the root as खाणें to eat, खाणार, निजणें, to sleep, निजणार.

2. The prospective tense is made up of the future participle of the principal verb and असणें.

3. It is either present, past, or future prospective, according as the verb असणें is in the present, past, or future, as तो गाणार आहे He is going to sing; तो गाणार होता He was going to sing. तो गाणार असेल He will be going to sing.

4. It indicates the intention or probability of the agent to do the act expressed by the principal verb; as, मी तुझ्याकडे उद्यां येणार आहें I am going to come to yours to-morrow.

5. The future prospective, like the future imperfect, expresses a doubt or uncertainty; as; तुझी आई तुला खाऊ देणार असेल Your mother must be going to give you sweetmeat.

अंमळad आधीं *ad.* a little earlier.
आजोळ *n.* house of one's mother's father.
आर्जवn करणें *v.a.* to beseech.
इतःपर *ad.* henceforward.

---

* See Appendix, Note 5.

Digitized by Google

इतिहास *m.* a history.
कड *f.* the hollow above the hip.
कादंबरी *f.* a novel, a fabulous story.
कुस्ती *f.* wrestling.
खातें *n.* department.
गोठा *m.* a cowpen.
घडणें *v. n.* to take place.
दमविणें *v. a.* to tire.
डांक *f.* mail.
चतुर्मास *m.* the four months [of rain.
जमाबंदी *f.* revenue.
तपासणें *v. a.* to revise, to examine.
तोड/करणें *v. a.* to settle, to compromise.
कचेरी *f.* an office.
दिपवाळी (दिवाळी) *f.* the great Hindu holidays.

1 I am going to begin Sanskrit a little earlier to-day. 2 We are going to pass this May-vacation at the house of our maternal grand-father in Bombay. 3 The class master was going to keep a strict eye over your son since that day. 4 I shall not be going, father, to Haripunt to read Persian henceforward. 5 They are going to read history to-morrow in the afternoon. 6 My son will be going to accompany his mother to Mahâlaxumi at that time. 7 My father must be going to his office on this Sunday, perhaps. 8 He was going to read one of the Scott's novels during the Divâli holidays. 9 The Collector of Poona was going to offer him a place in the Revenue department. 10 The mail train will be going to start for Calcutta on Saturday in the afternoon. 11 I am going to examine your slates just now. 12 They were going to compromise the suit between themselves out of court. 13 The house was about to take fire, but the green trees protected it. १४ ती अमळ तुझ्या आधीं देवास जाणार होती. १५ एवढ्याशा कामा करितां आह्मी त्या नीच मनुष्याचें आर्जव करणार होतों काय? १६ त्यांचीं सर्व मुलें येत्या दिवाळीला आपल्या आजोळीं जाणार आहेत. १७ इतःपर आह्मी असली गोष्ट कधींही कबूल करणार नाहीं. १८ कचेरी मध्यें तुला इतिहासाची कधींच गरज लागणार नाहीं. १९ आतां तूं मोठा झालास, तुला आतां कोण वरें कडेवर घेणार आहे? २० तूं आपला सारा वेळ कादंबरी वाचण्यामध्यें घालवणार असशील! २१ आम्ही आमच्या काका बरोबर आज कुस्त्या पहावयास जाणार आहों. २२ शेवटीं तो पोष्ट खात्यामध्यें चाकरी धरणार आहे. २३ त्या पुस्तकाची मला उद्यां गरज लागणार होती पण तें तू आतां ने. २४ या घाणेरड्या गोठ्या मध्यें कोण दे

Digitized by Google

बाबा वाचायला बसणार आहे. २५ असें कसें घडेल. २६ येत्या चातुर्मासांत आम्ही ठाण्यास रहाण्याला जाणार आहों. २७ सर्वांत जमाबंदी फार महत्वाचें खातें. २८ विलायतची डांक केव्हां सुटणार आहे? २९ त्याचा मी आतांच तपास करणार होतों. ३० कालची पोथी मग आपण केव्हां तपासणार आहां? ३१ तुमच्यांमध्यें आट्यापाट्याच्या खेळांत मला कोण दमविणार आहे? ३२ तुम्हीना! दिवाळीचे लाडू खाण्यांत मला दमवाल.

LESSON XXXVI.

धका *m.* a mound, a wharf.
नारायण *m.* name of a man.
नेहमींचा *a.* usual.
पाऊस *m* **पडणें** *v. n.* to rain.
भाग, अध्याय *m.* a chapter of a book.
भागवत *n.*, name of a book.
मत *n.* an opinion.
मक्तेदार *m.* a contractor.
मेहेरबानी *f.* a favour.
युक्ति *f.* a plan, a contrivance.
लांबलचक *a.* lengthy, prolix.
वारा *m.* wind.
लिलांव *n.* an auction.
विकत आणणें *v. a.* to buy.
वैद्यशास्त्र *n.* medicine.
स्वतां *ad.* personally.
सासुरवाड *f.* house of one's father-in-law.
सुटी *f.* a holiday.
सोंग *f.* a disguise, a character.
हमजेखान *m.* name of a Mohomedan.

1 I am going to write a letter to Mr. Vásudeva this afternoon. 2 Yesterday I was going personally to see the contractor to settle that affair. 3 She is going to England next year to study medicine. 4 I was about to fall into the well. 5 What are they going to tell me about him? 6 My uncle was going to send me to the theatre yesterday, but my father did not like it. 7 He is going to recommend me to the Collector for a place in the Revenue department. 8 My servant was going to come this morning, but it rained very hard and he did not come. 9 This horse is going to be sold by auction. 10 They have been going to build a house for the last six months. 11 When are you going to give me that novel to read? 12 She has been going to tell me that story for several days. 13 He was himself going to be killed on that occasion. 14 You will

Digitized by Google

be about to go to your office at this time to-morrow, will you not? 15 He was going to return from America by the next mail steamer. 16 I was going to invite my friends to dine with us to-day. 17 What are you going to do now? 18 My father will be going to take a walk on the sea-shore this evening with me and my uncle. 19 I shall be going to take a walk a little earlier than usual. 20 He will find no time to talk to anybody after supper. 21 Some guests will be going to come to your house after that time. 22 Is the marriage of your daughter going to take place this year? 23 But I am not going to do you the favour. 24 I shall find no time to read your lengthy letter. 25 He is going to place you under great obligation. 26 We are going to get a holiday the day after to-morrow. 27 They must be going to revise the last two chapters of the history of Greece. 28 They will be going to read the Bhágávat during the next four monsoon months (चतुर्मास).

१ आमचा मामा पुढल्या वर्षी काशीस जाणार आहे. २ तें मूल आतां धक्क्यासरशीं पडणार होतें. ३ आह्मांला तुह्मी तुळशीतलाव पहायाला केव्हां नेणार आहां? ४ इतःपर आह्मी या कामाकरितां त्याच्या घरीं जाणार नाहीं. ५ रामजी उद्यां हमजेखानाबरोबर कुस्ती मारणार आहे. ६ आपण येथें आणखी किती दिवस राहणार आहां? ७ गोपाळ नारायणाच्या दुकानावर मी पुस्तकें विकत आणण्यास जाणार आहें. ८ एवढ्या मोठ्या मुलाला आतां कडेवर उचलून कोण घेणार? ९ चार रुपयांच्या खालीं मी तुला हें पुस्तक देणार नाहीं. १० मी त्याच्याच मताप्रमाणें चालणार होतों. ११ असलें घाणेरडें काम कोण करणार आहे? १२ तर मग गोठ्यांत गाय कोण बांधणार होता? १३ ते आज दोन प्रहरीं घरीं राहणार आहेत. १४ येत्या दिपवाळीला आह्मी पुण्यास आजोळीं जाणार आहों. १५ यंदा तुह्मी आपल्या मुलाला सासुरवाडीस पाठविणार आहां का? १६ आज दोन वर्षें तो तें पुस्तक लिहिणार आहे. १७ मी आमच्या दादाला एक पुस्तक पाठविणार होतों पण अद्याप त्याचें पत्र नाहीं. १८ असल्या द्वाड मुलाच्या वाऱ्यास मी जाणार? १९ तूं आपला धंदा कालरात्रीं शिकणार होतास ना? २० तो आंगरखा माझे आंगांत होणार नाहीं. २१ आतां शिंपी तो पुन्हा नीट करणार आहे. २२ आतां कसलें सोंग येणार आहे? २३ तुमचें नवें टेबल केव्हां तयार होणार? २४ मी आतां तीच युक्ति योजणार आहें. २५ तो अशी गोष्ट

Digitized by Google

कबूल करणार नाहीं. २६ मी समजलों; तूं मला दमविणार आहेस. २७ त्याला जाऊंदे; ऊमाच्या वेळीं त्याची फार गरज लागणार आहे. २८ तो माझें आर्जव करणार आहे; पण मी त्याचें ऐकणार नाहीं. २९ तो माझ्या मतानें चालणार नाहीं. ३० मला आई ती गोष्ट सांगणार होती. ३१ इतःपर मी ही गोष्ट विसणार नाहीं. ३२ काशी मला आपलें पुस्तक दाखविणार आहे. ३३ तो त्या कादंबरीचें मराठींत भाषांतर मजकरितां करणार आहे.

LESSON XXXVII.

The Defective Verbs.

1 पाहिजे (to be wanted), नको (to be not wanted), आहे (is), and (its negative) नाहीं are used as Principal as well as Auxiliary verbs.

2 पाहिजे and नको hardly undergo any change in conjugation. They always take the agent in the Dative case; as, तिला तें पुस्तक पाहिजे, she wants the book.

3 Present, Past and Future forms of असणें are, however, used after them to make up the tenses, as:—

मला पुस्तक पाहिजे आहे, or नको आहे.	I want, or, I do not want the book.
तिला पुस्तक पाहिजे होतें, or नको होतें.	She wanted, or did not want, the book.
त्यांना पुस्तक पाहिजे असेल, or नको असेल.	They may want, or, may not want, the book.

4 As an Auxiliary, पाहिजे follows the past tense and नको the infinitive of the principal verb and takes the subject in the Dative, Instrumental or Nominative; as, मला or (मीं) तें पुस्तक दिलें पाहिजे,* I must give that book; तूं तें पुस्तक देउं नको,† do not give that book; त्याला or त्यानें गेलें पाहिजे, or तो गेला पाहिजे, he must go.

---

* With the principal verb, the doer follows the rule of that verb also. See Lesson 8 Part II Art. 2 and Lesson 12 Part 11 Art. 1.

† This is mostly used in the 2nd person imperative.

Digitized by Google

5 पाहिजे expresses necessity, while नको denotes no necessity of the action denoted by the principal verb being performed by the doer.

6 They are also joined to the Dative Supine of the principal verb to express the propriety or otherwise respectively; as, त्याला जायाला (जायला) पाहिजे, he should go; त्याला जायाला (जायला) नको, he need not go.

7 As an Auxiliary, नाहीं is used to mark the mere negation of an idea as well as to express the compound tenses of the principal verb; in both cases, the principal verb has the same form; as—

Assertive.	*Negative.*
मी लिहितों. I write. मी लिहित आहें.‡ I am writing.	मी लिहित नाहीं. I do not write; I am not writing.
मी लिहिलें. I wrote. मी लिहिलें आहे ‡ I have written.	मी लिहिलें नाहीं. I did not write; I have not written.
मी लिहिणार आहें.‡ I am going to write; मी लिहिन. I will write.	मी लिहिणार नाहीं. I am not going to write; I will not write.

अपराधी *a.* faulty.
अप्रबुद्ध *a.* dull.
इलाज *m.* a remedy.
उसनाघेणें *v. a.* to borrow.
रान *n.* weed.
करवंद *n.* a blackberry.
कवाड *n.* a gate.
उगाच *ad.* without cause.
उघडणें *v. a.* to open.
उपाशीं *a.* fasting.
गोड *n.* a sweet thing.
गोमांस *n.* beef.
चिंता/असणें *v. n.* to matter.
चाकू *m.* a pen-knife.

---

‡ In colloquial language, this आहे is sometimes retained in the negative sentence with नाहीं, in order to distinguish the compound tense; as, मी लिहीत नाहीं आहे. I am not writing.

Digitized by Google

कुलूप *n.* a padlock.
कैदी *m.* a prisoner.
कोंपरा *m.* a corner.
कांहीं*a.*नाहीं *v. n.* nothing.
चौकट *f.* a frame.
जगविणें *v. a.* to save.
जीव *m.* a life.
ठसा *m.* a print.

1 I am not at fault. 2 He does not want such a dull boy to do that work. 3 Do not make use of that remedy to improve him. 4 Do not punish children without cause. 5 You ought to open the box for him. 6 Rámá may not be fasting during the whole day. 7 The merchants must often borrow money to carry on their business. 8 They are not gathering blackberries for their mother, but for themselves. 9 We were going to open the gate of the garden. 10 The prisoner was going to run away from the hands of the Police. 11 They were, therefore, going to keep him under lock and key. 12 In a corner of the garden, the children will be going to play in the afternoon. 13 My uncle need give him nothing but two Rupees. 14 You must be going to choose the sweet things only but they are not generally wholesome. 15 He did not buy beef; no Hindu will ever eat beef. 16 Just so, I was going to say the same thing. 17 Krishnajipunt must have taken my penknife to mend his pen from the drawer of my table. 18 Well he may have taken; what does it matter? 19 Do not take away the picture from the room, you will break its frame. 20 You must save the life of your fellow-creatures. 21 Are these not the foot-prints of your younger brother? २२ तूं अपराधी असला पाहिजेस. २३ गोविंदराव-जींची मुलगी अप्रबुद्ध नाहीं. २४ त्याच्याबद्दल मी कांहीं इलाज केला नव्हता. २५ डगाच एखाद्याच्या पाठीस लागूं नको. २६ त्यांच्या कारकुनाला राव-साहेबांचीं सर्व पत्रें उघडलीं पाहिजेत. २७ उपाशीं रहाण्याचें त्याला काय कारण असलें पाहिजे. २८ कायगो! हा दागिना तूं उसना घेतला असशील? २९ बहूतकरून या महिन्यामध्यें रानांत पुष्कळ करवंदें पिकूं लागलीं पाहिजेत. ३० त्या बागेचें कवाड तूं किंवा मीच उघडलें पाहिजे असेल? ३१ काशी-रावानें त्याला कुलूप घातलें असलें पाहिजे. ३२ त्या कैद्यांना मोकळें सोडूं नको, त्यांना बेडया घातल्या पाहिजेत. ३३ तुमचा बैल आमच्या बागेच्या कोपऱ्यांत उभा आहे, तो कांहीं खात नाहीं. ३४ तुला माझा चाकू उघां

Digitized by Google

संध्याकाळच्या आंत दिला पाहिजे. ३५ पलीकडच्या दाराची चौकट फार ठेंगणी झाली आहे, ती जरा उंच केली पाहिजे. ३६ प्रत्येकाला आपला जीव पाहिजेच असतो. ३७ तो जगविण्यास कोण यत्न करणार नाहीं बरें! ३८ तुमच्या बोलण्याचा त्याच्या मनावर चांगलाच ठसा उमटला पाहिजे. ३९ गोड गोड म्हणून किती खायचें! त्याला कांहीं तरी बरा असली पाहिजे. ४० तुला गोमांसाची शपथ कोणी कशाकरितां घातली? ४१ या चाकूनें नानाला आतां ही लेखणी केलीच पाहिजे.

LESSON XXXVIII.

डौल *m.* an empty display.
तसबीर *f.* a picture.
नातू *m.* a grandson.
निर्भयपणें *ad.* securely.
पायरी *f.* a step.
प्रेतसंस्कार *m.* funerals.
पेंडसे *m.* a surname.
बाकीचा *a.* remaining.
मिरवणें *v. n.* to parade.
राव *a.* a title of honour affixed to the names of persons, chiefly of soldiers and clerks.
रिकामा *a.* empty.
लावणें *v. a.* to apply.

1 Govind is not making an empty display of his learning. 2 Sadáshiva does not make an empty display of his learning. 3 You must paint a good picture of your mother and keep it in a corner of your room. 4 Her grandsons have not seen her. 5 You must keep that picture securely fastened on the wall of your room. 6 Govindràо must have gone to perform the funerals of his mother. 7 I must prepare my remaining lesson tomorrow. 8 What must be the difference between steps and stairs. 9 He must be parading in his new dress before his companions. 10 Take away the weed from your fields and the crops will flourish. 11 Do not bring empty pots from the well. 12 He must have done so in his childhood. 13 You must apply this rule in your own case also. 14 Kashiràо must make a good soldier. १५ तूं असे उगाच रिकामे डौल मिरवूं नको. १६ ती कोंपऱ्यांतली तसबीर नानाफडणवीसांची असली पाहिजे. १७ आह्मांला पुढच्या सालाकरितां घाल्य

Digitized by Google

विकत घेतलें पाहिजे. १८ आपणाला नातु शिकवायाला नको. १९ तिला निर्भयपणें खोलींत गेलें पाहिजे होतें. २० कोणताही विषय पायरी पायरीनें शिकला पाहिजे. २१ प्रत्येक मुलाला वडिलाचा प्रेतसंस्कार केलाच पाहिजे. २२ उद्यां मला बाकीचा वेळ पेंड्याच्या घरीं घालविला पाहिजे. २३ सज्जनांच्या घरीं पंगतीभेद नसला पाहिजे. २४ लग्नाची वरात तुझाला मिरवलीच पाहिजे. २५ माळ्याच्या मुलींनीं बागेंतील सर्व रान उपटलें असेल. २६ राव ही पदवी विशेषेंकरून मराठ्यांचीच असली पाहिजे. २७ मी तुमच्या घरीं रिकामा खात नाहीं. २८ रिकामें भांडें उचमळलें पाहिजे. २९ त्यानें लहानपणीं असल्या खोड्या केल्या नाहीं. ३० तो लहानपणीं संस्कृत शिकला नाहीं. ३१ तुम्हांला पुढच्या वर्षी नारळीचीं रोपें बागेंत आणखी लाविलीं पाहिजेत. ३२ त्या डोंपरावर तुम्हांला अद्याप औषध लावलें पाहिजे. ३३ तोच नियम याही ठिकाणीं आम्हांस लावला पाहिजे. ३४ येत्या दसऱ्यापासून आमच्या मुलाला आतां शाळेस लावला पाहिजे. ३५ दुःखावर विवा चांगला लागला पाहिजे. ३६ तुझे शब्द त्या वेळीं त्याच्या मनाला फारच लागले असतील. ३७ तुमचा कलमी आंबा यंदा मुळींच लागला नाहीं. ३८ काल आणखी दोन माणसें वरच्या आळीस लागलीं आहेत. ३९ आज आमच्या गवळ्याची म्हैस लागली नाहीं, तिचें कालच वासरूं मेलें. ४० त्याला एकदां काम करूं लागलें पाहिजे, मग तो थांबणार नाहीं.

LESSON XXXIX.

वाटणें *v. n.* to think.	**स्वच्छ** *a.* clean.
वात *f.* a wick.	**संभवनीय** *a.* probable.
वाढविणें *v. a.* to increase.	**समाधान न करणें** *v. a.* to
वारंवार *ad.* often.	**सरळ** *a.* straight. [satisfy.
शब्द *m.* a word.	**संवय** *f.* a habit. [man.
शरम *f.* shame.	**सभ्य गृहस्थ** *m.* a gentle-
शाई *f.* ink. [punish.	**हिंवाळा** *m.* the winter.
शिक्षा *f* **करणें** *v. a.* to	**हुकूम** *m.* an order.

1 You were not then reading. 2 The women in that corner are not working. 3 Those girls are not injuring the plants in your garden. 4 Were they not dancing in the school-hall? 5 Do not keep company with bad people. 6 The husbandman was not tilling the ground for a crop of

Digitized by Google

wheat. 7 It is necessary for the eldest son to attend to the funeral rites in honour of his dead parents; the rest need not take a part in it. 8 They never borrowed such a large sum of money from me before. 9 Bála! come here and sit in this room to study your lessons, and do not leave it for two hours on any account. 10 I have no reason to find fault with your grandson. 11 He is not often idle. 12 You are not, however, satisfied with him. 13 You are not ignorant of his habit of lying. 14 I do not rely upon his words. 15 He does not listen to you. 16 They did find many blackberries in the field. 17 Oh! it does not matter much. 18 We shall not hurt the corn in his field. 19 Besides, the farmer will not see us. 20 The farmer's seeing us or not makes no difference. 21 Is not the farmer himself coming this way? 22 George's story did not seem to him a very probable one. 23 He, however, did not wish to punish the boy. 24 Not only were there no prints of the cow's feet, but the gate was securely fastened by a chain and padlock. 25 I did not steal your corn; I would not do it for the world. 26 The farmer did not let him go. 27 George hung his head and made no answer. 28 She said nothing more that day. 29 Stop! Stop! do not add to your fault. 30 Does not God see you everywhere? 31 I had no courage. 32 Do you not believe me, mother? 33 I am speaking nothing but the truth now. 34 He will not tell a lie even to save his life. 35 He thought it better not to speak to him just then. 36 I will never tell a lie again. 37 There was not a happier family in the village than that of widow Burton. 38 Willy and Catherine did not come home to be idle. 39 Not a weed was to be seen there. 40 In the winter, too, they were not in want of employment. 41 Things in this world do not go on smoothly. 42 Oh Willy! will not Mrs. Benson buy these things? 43 Mrs. Benson had not only bought all his boxes, but had given him an order for some picture frames.

१ वारा वाहत नाहीं. २ हरी त्याच्या घरीं काल गेला नव्हता (नवता). ३ तूं आजपासून आमच्या वराची पायरी चढूं नको. ४ त्यानें माझा अंगरखा

Digitized by Google

फाडला नाहीं, परंतु मळवला तर खरा. ५ त्या वेळीं आमचा कुत्रा भुंकत नव्हता. ६ मला पैसा मिळत नाहीं व खावयास मुलें आठ आहेत. ७ तर मग तीं उपाशीं मरत नाहींत? ८ मी त्याचे पाटीकडे पहात नाहीं. ९ येथें तुला या मुलांशीं भांडायाला (भांडायला) कोणी बोलावलें नाहीं. १० मी बाजारांत पेंडश्यांच्या दुकानीं जाऊं नको का? ११ बाबा! मला एक टोपी पाहिजे; माझी सांडली नाहीं पण फाटली आहे. १२ आमचा गडी कोणाच्या पैशाला हात लावणार नाहीं. १३ आजपर्यंत त्यानें असलें काम कधीं केलें नाहीं. १४ त्यानें दिव्यांत वात घातली नाहीं आणि आहे ती जळत नाहीं. १५ आम्हीं तीं कधीं फळें खाणार नाहीं. १६ तुम्ही तीं आतां खात नव्हतां का? १७ कृष्णाजीपंतांकडून भागवताची पोथी आण जा. १८ आतां ती ते वाचीत नसतील. १९ हिंदू लोक गोमांस खात नाहींत. २० मला कादंबऱ्या वाचणें आवडत नाहीं. २१ चाकरानें अद्याप दुकान उघडलें नाहीं; तूं तें उघडूं नको. २२ तुम्ही आपल्या मित्रांनां कधीं विसरूं नका. २३ ते आतांशा अभ्यास चांगलासा करीत नाहींत. २४ सदाशिवपंत अद्याप पुण्याहून आले नाहींत. २५ त्या कैद्यानें अपराध केला नाहीं. २६ हें पाणी स्वच्छ नाहीं; तूं मला दुसरें आणीत नाहींस काय? २७ माझ्या हाताशीं पैसा नाहीं. २८ लहानपणींच मी आपल्या मुलींचें लग्न करणार नाहीं. २९ तुमचे पाहुणे इतक्यांत जाणार नव्हतेना? आणि (नी) आतां बरे गेले? ३० मी तुझा चाकू घेतला नाहीं. ३१ त्याच्या बायकोला गोड आवडत नाहीं. ३२ माझ्या दवतींत कालपासून शाई नाहीं. ३३ हें चाकर माणसांच्या लक्षांत येत नाहीं. ३४ सर्व मुलें अद्याप आलीं नाहींत. ३५ त्या गरीब बाईला उगाच मारूं नको. ३६ काशीरावाला काम करायला नको. ३७ त्याला त्यावेळीं शाळेंत गेलें पाहिजे. ३८ तुमच्या जिभेला हाड नाहीं, आणि तुमच्या चाकरांस शरम नाहीं. ३९ सभ्य मनुष्यास असले शब्द शोभत नाहींत. ४१ आम्हाला तसले रिकामे डोल भिरवायला नकोत. ४२ मला तें लग्नास जाणें नको, आणि तीं बायकांचीं घाणेरडीं बोलणीं ऐकायाला (आयकायला) नकोत. ४३ आपला मुलगा कांहीं अप्रबुद्ध नाहीं; पण तो अभ्यास करीत नाहीं.

Digitized by Google

Note 1.

Declension of Pronouns.

	मी I.		तूं Thou.	
	Singular.	*Plural.*	*Singular.*	*Plural.*
Nom.	मी	आह्मी.	तूं	तुह्मी.
Acc.	मी	आह्मी.	तूं	तुह्मी.
Instr.	म्यां or मीं मजशीं	आह्मीं. आह्मांशीं.	त्यां or तूं तुजशीं	तुह्मीं. तुह्मांशीं.
Dat.	मला मजला	आह्मांला-स.	तुला तुजला	तुह्मांला-स.
Abl.	मजहून	आह्मांहून.	तुजहून	तुह्मांहून.
Gen.	माझा *m.* माझी *f.* माझें *n.*	आमचा *m.* आमची *f.* आमचें *n.*	तुझा *m.* तुझी *f.* तुझें *n.*	तुमचा *m.* तुमची *f.* तुमचें *n.*
Loc.	माझ्यांत	आह्मांत. आमच्यांत.	तुझ्यांत.	तुह्मांत. तुमच्यांत.

तो He, ती She, तें It.

	Singular.			*Plural.*		
	m.	*f.*	*n.*	*m.*	*f.*	*n.*
Nom.	तो	ती	तें.	ते	त्या	तीं.
Acc.	तो	ती	तें.	ते	त्या	तीं.
Instr.	त्यानें-नें त्यांशीं त्याजशीं	तिनें-णें तिशीं तिजशीं	त्यानें-नें. त्यांशीं. त्याजशीं.	त्यांनीं-नीं, त्यांशीं त्यांजशीं	the same as masculine.	
Dat.	त्याला त्याजला त्यास	तिला तिजला तिस	त्याला. त्याजला. त्यास.	त्यांला, त्यांजला, त्यांस. त्यांना.		
Abl.	त्याहून त्याजहून	तिहून तिजहून	त्याहून त्याजहून.	त्यांहून त्यांजहून.		
Gen.	त्याचा *m.* त्याची *f.* त्याचें *n.*	तिचा *m.* तिची *f.* तिचें *n.*	त्याचा *m.* त्याची *f.* त्याचें *n.*	त्यांचा *m.* त्यांची *f.* त्यांचें *n.*		
Loc.	त्यांत त्याच्यांत	तींत तिच्यांत	त्यांत. त्याच्यांत.	त्यांत त्यांच्यांत.		

Digitized by Google

जो *m.* who, जी *f.* who, जें *n.* who.

	Singular.			*Plural.*			
	m.	*f.*	*n.*		*m.*	*f.*	*n.*
Nom.	जो	जी	जें.	Nom.	जे *m.*	ज्या *f.*	जीं *n.*
Acc.	जो	जी	जें.	Acc.	„	„	„
Instr.	ज्यानें-यें / ज्यानीं	जिनें-यें / जिणी	ज्यानें-यें. / ज्यानीं.	Instr.	ज्यांनीं णीं	The same as [masculine.	
Dat.	ज्याला / ज्यास	जिला / जिस	ज्याला. / ज्यास.	Dat.	ज्यांला / ज्यांस.		
Abl.	ज्याहून	जिहून	ज्याहून.	Abl.	यांहून		
Gen.	ज्याचा *m.* / ज्याची *f.* / ज्याचें *n.*	जिचा *m.* / जिची *f.* / जिचें *n.*	ज्याचा *m.* / ज्याची *f.* / ज्याचें *n.*	Gen.	ज्यांचा *m.* / ज्यांची *f.* / ज्यांचें *n.*		
Loc.	ज्यांत	जींत	ज्यांत.	Loc.	ज्यांत.		

हा *m.* this, ही *f.* this, हें *n.* this.

	Singular.			*Plural.*			
					m.	*f.*	*n.*
Nom.	हा *m.*	ही *f.*	हें *n.*	Nom.	हे	ह्या	हीं.
Acc.	„	„	„	Acc.	„	„	„
Instr.	ह्यानें-यें / ह्यांनीं	हिनें-यें / हिणी	ह्यानें-यें. / ह्यांनीं.	Instr.	ह्यांनीं-णीं / ह्यांणी.	The same as [maculine.	
Dat.	ह्याला / ह्याजला, / ह्यास	हिला / हिजला, / हीस	ह्याला, / ह्याजला, / ह्यास	Dat.	ह्यांला / ह्यांजला, / ह्यांस		
Abl.	ह्याहून / ह्याजहून	हिहून / हिजहून	ह्याहून / ह्याजहून	Abl.	ह्यांहून, / ह्यांजहून		
Gen.	ह्याचा *m.* / ह्याची *f.* / ह्याचें *n.*	हिचा *m.* / हिची *f.* / हिचें *n.*	ह्याचा *m.* / ह्याची *f.* / ह्याचें *n.*	Gen.	ह्यांचा *m.* / ह्यांची *f.* / ह्यांचें *m.*		
Loc.	ह्यांत	हींत	ह्यांत.	Loc.	ह्यांत	„	„

Under inflexional changes हा and हें are often changed to वा, as, वानें or ह्यानें, and ही to इ, as, इनें or हिनें.

Digitized by Google

कोण ? who?			काय ? what?		
	Sing.	*Pl.*		*Sing.*	*Pl.*
Nom. & Acc.	कोण	कोण.	Nom. & Acc.	काय	काय
Instr.	कोणी / कोणाशी	कोणीं / कोणांशीं.	Instr.	कशानें / कशाशीं	कशांनीं. / कशांशीं.
Dat.	कोणाला-स-कोणांला.		Dat.	कशाला-स	कशांला-स.

कोणता which one.

Singular.	*Plural.*
Nom.&Acc. कोणता*m.* कोणती*f* कोणतें *n.* [शीं *f.* कोणत्यानें *n.*	कोणते *m.* कोणत्या *f.* कोणतीं *n.* कोणत्यांनीं-शीं The same as
Instr. कोणत्यानें-शीं*m.* कोणतीनें-	masculine.

Note 2.

TABLE OF CASE TERMINATIONS AND POSTPOSITIONS

The Nominative and Accusative cases have no terminanations or postpositions.

Singular.	*Plural.*	*Postpositions.*
Instr. नें, शीं by, with	नीं, शीं=with, against.	कडून, करून, करवीं, अवळून हारें.
Dative स, ला to	स. ला, ना.	पाशीं, अवळ, प्रत to, करितां, साठीं, अर्थ, स्तव for.
Ablative ऊन from हून from or than	The same as [singular.	पासून, अवळून from, पेक्षां, परीस, than.
Genitive चा*m.* ची*f.* चें *n.* of	The same as [singular.	None.
Locative ईं, यां in	The same as [singular.	आंत, मध्यें in, विषयीं, संबंधी about.
Vocative, the crude-form.		अरे, रे, हे, अजी, अगा, गा*m.n.O*; अगे, गे अगो, अजी *f.O.* *Singular.* अहो, अजी*m. f. n. O.* Plural.

Digitized by Google

NOUNS DECLINED.

MASCULINE.

वाघ A tiger.

	Singular.	*Plural.*
Nom.	वाघ.	वाघ.
Acc.	वाघ,	वाघ.
Instr	वाघानें-शीं.	वाघांनीं-शीं.
Dat.	वाघास-ला.	वाघांस-ला-ना.
Abl.	वाघाहून.	वाघांहून.

	Singular.	*Plural.*
Gen.	वाघाचा*m.*	वाघांचा*m.*
	ची*f.* चें*n.*	ची*f.* चें*n.*
Loc.	वाघांत.	वाघांत.
Voc.	वाघा.	वाघांनों.

घोडा A horse.

	Singular.	*Plural.*
Nom.	घोडा	घोडे.
Instr.	घोड्यानें-शीं.	घोड्यांनीं-शीं.
Voc.	घोड्या.	घोड्यांनो.

साळी A weaver.

	Singular.	*Plural.*
Nom.	साळी.	साळी.
Instr.	साळ्यानें-शीं.	साळ्यांनीं-शीं.
Voc.	साळ्या.	साळ्यांनों.

नारू Guineaworm.

	Singular.	*Plural.*
Nom.	नारू.	नारू.
Instr.	नारूनें-शीं. नारवानें-शीं.	नारूंनीं-शीं. नारवांनीं-शीं.
Voc.	नारू, नारवा.	नारूंनों, नारवांनों.

टाहो Cry of certain birds.

	Singular.	*Plural.*
Nom.	टाहो.	टाहो.
Instr.	टाहोनें-शीं.	टाहोंनीं-शीं.
Voc.	टाहो.	टाहोंनों.

Feminine.

संगत Society.

	Singular.	*Plural.*
Nom.	संगत.	संगती.
Instr,	संगतीनें-शीं.	संगतींनीं-शीं
Voc.	संगती	संगतीनों.

लाट A wave.

	Singular.	*Plural.*
Nom.	लाट.	लाटा.
Instr.	लाटेनें-शीं	लाटांनीं शीं.
Voc.	लाटे.	लाटांनों.

माता Mother.

	Singular.	*Plural.*
Nom.	माता.	माता.
Instr.	मातेनें-शीं.	मातांनीं-शीं.
Voc.	माते.	मातांनों.

नदी A river.

	Singular.	*Plural.*
Nom.	नदी.	नद्या.
Instr.	नदीनें-शीं.	नद्यांनीं-शीं.
Voc.	नदी.	नद्यानों.

Digitized by Google

बायको A woman.

	Singular.	*Plural.*
Nom.	बायको	बायका.
Instr.	बायकोनें-शीं.	बायकांनीं-शीं.
Voc.	बायको,	बायकांनों.

जळू Leech.

	Singular.	*Plural.*
Nom.	जळू.	जळवा.
Instr.	जळवेनें-शीं. / जळूनें-शीं.	जळवांनीं-शीं.
Voc.	जळवे, जळू.	जळवांनों.

काईल A boiler.

	Sing.	*Plural.*
Nom.	काईल.	कायली.
Instr.	कायलीनें-शीं.	कायलींनीं-शीं.
Voc.	कायली.	कायलींनों.

बी A seed.

	Sing.	*Plural.*
Nom.	बी.	बिया.
Instr.	बियेनें-शीं.	बियांनीं-शीं.
Voc.	बिये.	बियांनों.

Neuter.

फूल A flower.

	Sing.	*Plural.*
Nom.	फूल.	फुलें.
Instr.	फुलानें-शीं.	फुलांनीं-शीं.
Voc.	फुला.	फुलांनों.

मोतीं Pearl.

	Sing.	*Plural.*
Nom.	मोतीं.	मोत्यें.
Instr.	मोत्यानें-शीं.	मोत्यांनीं.
Voc.	मोत्या.	मोत्यांनों.

भसूं A tear.

	Sing.	*Plural.*
Nom.	भसूं	भस्वें
Instr.	भस्वानें-शीं.	भस्वांनीं-शीं.
Voc.	भस्वा.	भस्वांनों.

गुरूं A cattle.

	Sing.	*Plural.*
Nom.	गुरूं.	गुरें.
Instr.	गुरानें-शीं.	गुरांनीं-शीं.
Voc.	गुरा.	गुरांनों.

भांडें A pot.

	Sing.	*Plural.*
Nom.	भांडें	भांडीं.
Instr.	भांड्यानें-शीं	भांड्यांनीं-शीं.
Voc.	भांड्या.	भांड्यांनों.

कऊल A tile.

	Sing.	*Plural.*
Nom.	कऊल.	कवलें.
Instr.	कवलानें-शीं.	कवलांनीं-शीं.
Voc.	कवला.	कवलांनों.

Digitized by Google

Note 3.

There are about 290 feminine nouns ending in अ that are declined like लाट and the rest like संगत (*vide* Note 2). Of the former class, the following are of frequent occurrence in the language :—

अटक Impediment.
अवस The day of new moon.
आत Father's sister.
आंब A particular acid.
ईंट A brick.
ईद Any Mahomedan festival.
उणीव Deficiency.
ऊब Heat of closeness.
कड Edge.
कणीक Wheaten flour.
कंबर / कमर } The waist.
करप Victuals burned in dressing.
कांच Glass.
काव A red earth.
कुमक* Assistance.
कुळीक A violent vomiting and purging.
कैद Imprisonment.
खरूज* The itch.
खाट A sleeping cot.
खारीक The fruit of the date tree.
खूण An indication.
खेप A journey to and from, a trip.
गंजीफ A single card of a pack.
गप Common report, news.
गरज Need, want.
गुंज A small plant bearing a red and black berry.
चिंच The tamarind tree, its fruit.
चीज A thing, a fine thing.
चीप A slab of stone, a chip.
चीर A crack, slit, rent.
चुणूक Sample, smack.
जांग } The thigh.
जांघ } The groin.
जीभ The tongue.
झडप A stoop, swoop, bound.
झीज Waste, wear, rubbage.
झोप-झोंप Sleep.
टांग A low term for the leg.
टीक A cluster of pearls or diamonds.
टीच A span measured by the thumb and forefinger.
टीप Taking a number in order to tax. A manner of stitching.
डांक A disposition along a road to convey the post or travellers.
डांग A whole plantain-leaf. A crook of a bamboo.
ढेंग A stride.
तजवीज* Investigating, prudence.
तरफ Side, a lever.
तलफ An ill habit.
तवसाळ A kind of rice.
तहान Thirst.
तसीम A share.
ताज A bamboo-pole.
तान A tune.
तान्ह Thirst.
तांब Rust of iron.
तार A wire.

Digitized by Google

तारीख A day of the month; date.
तालीम Instruction.
तिडीक A sharp and shooting pain.
तीट* A mark made with soot on the forehead of children.
तेरीज The grand total.
तोफ A great gun.
दाढ A molar tooth.
दुरव A kind of grass, sacred to Ganapati.
नजर Sight, a present.
नणंद A sister of one's husband.
नथ A nose-jewel.
नाव A boat.
नीज Sleep.
पचाज Supercilious airs and ways.
पश्चिम The west.
पहांट The period of six घटिका before sunrise.
पाच An emerald.
पुनव The day of full moon.
पूर्व The East.
पेठ An emporium.
पैज A bet, wager.
फुंक A quick blast with the mouth.
फौज An army of troops.
बाग A garden, a band.
बाज A bedstead.
बीज The second day of the waxing moon.
बात Idle talk, empty speech.
बोंब The cry uttered by bellowing and at the same time beating the mouth with the hand.
भांग Hemp, Cannabis sativa.
भाष A promise.
भिक्षाळ The begging of alms by a young Brahmin during the ceremony of his investiture with the sacred thread.
भीक Alms.
भीड Respect, regard.
भुज The whole arm.
भूक Hunger.
भोवंड, भोवळ Giddiness.
मसक A leathern water-bag carried under arm.
मसूर A sort of pulse.
मात A term at chess, checkmate, exploit.
मान The neck.
माव A scar.
माळ A garland, a rosary.
मेंग Slough of a snake.
मोट A load, the bucket of a bullock draw-well.
मोहोर (properly मोहर) A gold coin, mohur; blossom.
मोहीम A military expedition, a compaign.
मौज A play, a diversion.
रकम An item an article.
रयत A subject.
राख Ashes, a kept woman.
रांग A rank, a row.
रांड A widow always with a contemptuous implication; a courtesan.
रीघ Entrance by force.
रेघ A line.
रेंव Fine gravel or sand.
लव The hair of the body, down.

Digitized by Google

लवंग A clove, its tree.
लाख Sealing wax, lac.
लांच A bribe.
लाज Shame, modesty.
लाट A wave.
लात A kick.
लांव A hideous and hateful woman.
लाळ Saliva, spittle.
लीख A nit.
वस्त A trinket.
वहाण A sandal.
वाट A road, a path, a way.
वाफ Vapour, steam.
वांबळ* Dull weather.
वांव A fathom. [Europe.
विलायत A foreign country, esp.
वीज Lightning.
वीट A brick.
वेंग Embrace.
वेण A throe.
वेळ Time, space of time.
भाक-ख A pot-herb.
शाल* A shawl. [ment.
शाळ A house or an apart-
शिंक A sneeze.
शिलक* Balance in hand.
शीव A boundary.
शीर A vein, an artery.
शेज A bed or bedding.
शेंद An empty cocoanut-shell.
शेंप A tail.
शेंस The spot or stripe of दही and कुंकूं mixed and daubed on the forehead.
सकाळ Early morning.
सडक A rope, a cord. A made road.
सदर (Eminent) the highest court of law.
समीध A stick, a span in length of pure trees to kindle sacred fire.
सहाण A grindstone, a levigating slab.
साखर Sugar.
सांज The evening.
सांड A female camel.
साण A grindstone.
सांव A muscle or sinew.
सींव A boundary, a border, a limit.
सुज Swelling.
सून A daughter-in-law.
सोंड Trunk of an elephant.
हांक A call, a loud cry after.
हांव Vehement, earnest desire.

N. B.—The words in the list marked with an asterisk are declined both ways.

Digitized by Google

Note 4.

The numbers are thus written and pronounced.

1	१ एक.	35	३५ पस्तीस.	71	७१ एकाहत्तर.
2	२ दोन.	36	३६ छत्तीस.	72	७२ बाहत्तर.
3	३ तीन.	37	३७ सदतीस.	73	७३ त्र्याहत्तर.
4	४ चार.	38	३८ अडतीस.	74	७४ चौऱ्याहत्तर.
5	५ पांच.	39	३९ एकुणचा०	75	७५ पंच्याहत्तर.
6	६ सहा.	40	४० चाळीस.	76	७६ शाहत्तर.
7	७ सात.	41	४१ एकेचाळीस	77	७७ सत्याहत्तर.
8	८ आठ.	42	४२ बेचाळीस.	78	७८ अठ्याहत्तर.
9	९ नऊ.	43	४३ त्रेचाळीस.	79	७९ एकुणऐंशी.
10	१० दहा.	44	४४ चव्वेचा०	80	८० ऐंशी.
11	११ अकरा.	45	४५ पंचेचाळीस	81	८१ एक्यायशी.
12	१२ बारा.	46	४६ शेचाळीस.	82	८२ ब्यायशी.
13	१३ तेरा.	47	४७ सत्तेचा०	83	८३ त्र्यायशी.
14	१४ चवदा.	48	४८ अठ्ठेचा०	84	८४ चौऱ्यायशी.
15	१५ पंधरा.	49	४९ एकुणप०	85	८५ पंचायशी.
16	१६ सोळा.	50	५० पन्नास.	86	८६ शायशी.
17	१७ सतरा.	51	५१ एकावन्न.	87	८७ सत्यायशी.
18	१८ अठरा.	52	५२ बावन्न.	88	८८ अठ्यायशी.
19	१९ एकुणीस.	53	५३ त्रेपन्न.	89	८९ एकुणनव्वद.
20	२० वीस.	54	५४ चौपन्न.	90	९० नव्वद.
21	२१ एकवीस.	55	५५ पंचावन्न.	91	९१ एक्याण्णव.
22	२२ बावीस, बेवीस.	56	५६ छपन्न.	92	९२ ब्याण्णव.
23	२३ तेवीस.	57	५७ सत्तावन्न.	93	९३ त्र्याण्णव.
24	२४ चोवीस.	58	५८ अठ्ठावन्न.	94	९४ चौऱ्याण्णव.
25	२५ पंचवीस.	59	५९ एकुणसाठ.	95	९५ पंचाण्णव.
26	२६ सवीस.	60	६० साठ.	96	९६ शाण्णव.
27	२७ सत्तावीस.	61	६१ एकसष्ट.	97	९७ सत्याण्णव.
28	२८ अठ्ठावीस.	62	६२ बासष्ट.	98	९८ अठ्याण्णव.
29	२९ एकुणतीस.	63	६३ त्रेसष्ट.	99	९९ नव्याण्णव.
30	३० तीस.	64	६४ चौसष्ट.	100	१०० शंभर.
31	३१ एकतीस.	65	६५ पांसष्ट.	101	१०१ एकशें एक.
32	३२ बत्तीस.	66	६६ सासष्ट.	102	१०२ एकशें दोन.
33	३३ तंतीस. तेहतीस.	67	६७ सदसष्ट.	200	२०० दोनशें.
34	३४ चवतीस, चौतीस.	68	६८ अडसष्ट.	300	३०० तीनशें.
		69	६९ एकुणहत्तर.	1,000	१,००० हजार.
		70	७० सत्तर.		

10,000 १०००० दहा हजार. 10,00,000 १०००००० दहा लाख.

1,00,000 १.०००० लाख. 1,00,00,000 १.०००००० कोटी.

Digitized by Google

Fractions.

$\frac{1}{4}$	·।· पाव.	$2\frac{3}{4}$	२॥। पावणेतीन.	$\frac{1}{2}$	$\frac{1}{2}$ एकद्वितीयांश.
$\frac{1}{2}$	·॥· अर्धा.	$3\frac{1}{4}$	३। सवातीन.	$\frac{1}{3}$	$\frac{1}{3}$ एकतृतीयांश.
$\frac{3}{4}$	·।॥· पाऊण.	$3\frac{1}{2}$	३॥ साडेतीन.	$\frac{1}{4}$	$\frac{1}{4}$ एकचतुर्थांश.
$1\frac{1}{4}$	१। सव्वा.	$3\frac{3}{4}$	३॥। पावणेचार.	$\frac{1}{5}$	$\frac{1}{5}$ एकपंचमांश.
$1\frac{1}{2}$	१॥ दीड.	$4\frac{1}{4}$	४। सवाचार.	$\frac{1}{6}$	$\frac{1}{6}$ एकषष्ठांश.
$1\frac{3}{4}$	१॥। पावणेदोन.	$4\frac{1}{2}$	४॥ साडेचार.	$\frac{1}{7}$	$\frac{1}{7}$ एकसप्तमांश.
$2\frac{1}{4}$	२। सवादोन.	$4\frac{3}{4}$	४॥। पावणेपांच.	$\frac{1}{8}$	$\frac{1}{8}$ एकअष्टमांश.
$2\frac{1}{2}$	२॥ अडीच.			$\frac{1}{10}$	$\frac{1}{10}$ एकदशांश.

These numerals generally take आ in the crude form, but दोन, तीन and चार are changed to दोहों, तिहीं and चोहों, and when they refer to persons they assume दोघे, तिघे, चौघे for masculine, -घी for feminine, -घे for neuter.

Note 5.

INDICATIVE MOOD.

Intransitive Verb.

बसणें, to sit.

Present Tense.

	Sing.		*Plural.*	
1.	मी बसतों *m.* मी बसत्यें *f.* मी बसतें *n.*	I sit	आह्मी बसतों. *m.f.n.*	We sit.
2.	तू बसतोस *m.* तू बसत्येस *f.* तू बसतेंस *n.*	Thou sittest.	तुह्मी बसतां. *m.f.n.*	You sit.
3.	तो बसतो *m.* ती बसत्ये *f.* तें बसतें *n.*	He, she, it sits.	ते बसतात *m.* त्या बसतात *f.* तीं बसतात *n.*	They sit.

Past Tense.

	Sing.		*Plural.*	
1.	मी बसलों *m.* मी बसल्यें *f.* मी बसलें *n.*	I sat.	आह्मीं बसल्यें. *m.f.n.*	We sat.

Digitized by Google

	Sing.		*Plural.*	
2.	तू बसलास *m.* तू बसलीस *f.* तू बसलेंस *n.*	Thou sattest.	तुह्मी बसलां or बसलेत *m.f.n.*	You sat.
3.	तो बसला *m.* ती बसली *f.* तें बसलें *n.*	He, she, it, sat.	ते बसले *m.* त्या बसल्या *f.* तीं बसलीं *n.*	They sat.

Future Tense.

	Sing.		*Plural.*	
1.	मी बसेन *m. f. n.*	I shall sit.	आह्मी बसूं *m.f.n.*	We shall sit.
2.	तू बसशील *m.f.n.*	Thou wilt sit.	तुह्मी बसाल *m.f.n.*	You will sit.
3.	तो *m.* ती *f.* तें *n.* बसेल	He, she, it, will sit.	ते *m.* त्या *f.* तीं *n.* बसतील	They will sit.

Habitual Past.

Sing.	*Plural.*
1. मी बसें *m. f. n.* I used to sit.	आह्मी बसूं *m. f. n.* We used to sit.
2. तू बसस *m.f.n.* Thou usedest [to sit.	तुह्मी बसा *m. f. n.* You used [to sit.
3. तो *m.* ती *f.* तें *n.* बसे He, she, it, used to sit.	ते *m.* त्या *f.* तीं *n.* बसत They used to sit.

Present Imperfect Tense.

	Sing.		*Plural.*
1.	मी बसत बसतों आहें *m.* मी बसत बसत्यें आहें *f.* मी बसत बसतें आहें *n.*	I am in the act of sitting.	आह्मी बसत बसतों आहों *m. f. n.* We are in the act of sitting.
2.	तू बसत बसतो आहेस *m.* तू बसत बसत्ये आहेस *f.* तू बसत बसतें आहेस *n.*	Thou art in the act of sitting.	तुह्मी बसत बसतां आहां *m. f. n.* You are in the act of sitting.
3.	तो बसत बसतो आहे *m.* ती बसत बसत्ये आहे *f.* तें बसत बसतें आहे *n.*	He, she, it, is in the act of sitting.	ते बसत बसतात आहेत *m.* त्या बसत बसतात आहेत *f.* तीं बसत बसतात आहेत *n.* (बसतील). They are in the act of sitting.

Digitized by Google

Past Imperfect Tense.

	Sing.		*Plural.*	
1.	मी बसत होतों *m.* मी बसत होत्यें *f.* मी बसत होतें *n.*	I was in the act of sitting.	आह्मी बसत होतों *m. f. n.*	We were in the act of sitting.
2.	तू बसत होतास *m.* तू बसत होतीस *f.* तू बसत होतेस *n.*	Thou wast in the act ot sitting.	तुह्मी बसत होतां *m. f. n.*	You were in the act of sitting.
3.	तो बसत होता *m.* ती बसत होती *f.* तें बसत होतें *n.*	He, she, it was in the act of sitting.	ते बसत होते *m.* त्या बसत होत्या *f.* तीं बसत होतीं *n.*	They were in the act of sitting

Future Imperfect Tense.

Sing.	*Plural.*
1. मी बसत असेन *m. f. n.* I shall be sitting.	आह्मी बसत असूं. *m. f. n.* We shall be sitting.
2. तूं बसत असशील *m. f. n.* Thou wilt be sitting.	तुह्मी बसत असाल. *m. f. n.* You will be sitting.
3. तो *m.* ती *f.* तें *n.* बसत असेल. He, she, it, will be sitting.	ते, *m.* त्या, *f.* तीं *n.* बसत असतील. They will be sitting.

Presnt Perfect Tense,

	Sing.		*Plural.*	
1.	मी बसलों आहें *m.* मी बसल्यें आहें *f.* मी बसलें आहें *n.*	I have sat.	आह्मी बसलों आहों *m. f. n.*	We have sat.
2.	तू बसला आहेस *m.* तू बसली आहेस *f.* तू बसलें आहेस *n.*	Thou hast sat.	तुह्मी बसलां आहां *m. f. n.*	You have sat.
3.	तो बसला आहे *m.* ती बसली आहे *f.* तें बसलें आहे *n.*	He, she, it, has sat.	ते बसले आहेत *m.* त्या बसल्या आहेत *f.* तीं बसलीं आहेत *n.*	They have sat.

Pluperfect Tense.

	Sing.		*Plural.*	
1.	मी बसलों होतों *m.* मी बसल्यें होतें or होत्यें *f.* मी बसलें होतें *n.*	I had sat.	आह्मी बसलों होतों *m. f. n.*	We had sat.

Digitized by Google

	Sing.		*Plural.*	
2.	तू बसला होतास *m.* तू बसली होतीस *f.* तू बसलें होतेंस *n.*	Thou hadst sat.	तुह्मी बसलां होता तुह्मी बसले होतेत *m. f. n.*	You had sat.
3.	तो बसला होता *m.* ती बसली होती *f.* तें बसलें होतें *n.*	He she, it had sat.	ते बसले होते *m.* त्या बसल्या होत्या *f.* तीं बसलीं होतीं *n.*	They had sat.

Future Perfect Tense.

	Sing.		*Plural.*	
1.	मी बसलों *m.* मी बसल्यें *f.* मी बसलें *n.*	असेन, I shall have sat.	आह्मी बसलों असूं *m. f. n.*	We shall have sat.
2.	तू बसला *m.* तू बसली *f.* तू बसलें *n.*	असशील Thou wilt have sat.	तुह्मी बसलां बसले असाल *m. f. n.*	You will have sat.
3.	तो बसला *m.* ती बसली *f.* तें बसलें *n.*	असेल He, she, it, will have sat.	ते बसले *m.* त्या बसल्या *f.* तीं बसलीं *n.*	असतील They will have sat.

Present Prospective Tense.

	Sing.	*Plural.*
1.	मी बसणार आहें *m. f. n.* I am going to sit.	आह्मी बसणार आहों *m. f. n.* We are going to sit.
2.	तू बसणार आहेस *m. f. n.* Thou art going to sit.	तुह्मी बसणार आहां *m. f. n.* You are going to sit.
3.	तो *m.* ती *f.* तें *n.* बसणार आहे. He, she, it, is going to sit.	ते *m.* त्या *f.* तीं *n.* बसणार आहेत They are going to sit.

Past Prospective Tense.

	Sing.		*Plural.*	
1.	मी बसणार होतों *m.* मी बसणार होत्यें *f.* मी बसणार होतें *n.*	I was going to sit.	आह्मी बसणार होतों *m. f. n.*	We were going to sit.
2.	तू बसणार होतास *m.* तू बसणार होतीस *f.* तू बसणार होतेंस *n.*	Thou wast going to sit.	तुह्मी बसणार होतां *m. f. n.*	You were going to sit.
3.	तो बसणार होता *m.* ती बसणार होती *f.* तें बसणार होतें *n.*	He, she, it, was going to sit.	ते बसणार होते *m.* त्या बसणार होत्या *f.* तीं बसणार होतीं *n.*	They were going to sit.

Digitized by Google

Future Prospective Tense.

	Sing.	*Plural.*
1.	मी बसणार असेन *m. f. n.* I may be going to sit.	आह्मी बसणार असूं *m. f. n.* We may be going to sit.
2.	तू बसणार असशील *m. f. n.* Thou mayest be going to sit.	तुह्मी बसणार असाल *m. f. n.* You may be going to sit.
3.	तो *m.* ती *f.* तें *n.* बसणार असेल He, she, it, may be going to sit.	ते *m.* त्या *f.* तीं *n.* बसणार असतील They may be going to sit.

INDICATIVE MOOD.

TRANSITIVE VERB.

कापणें, to cut.

Present Tense.

	Sing.		*Plural.*	
1.	मी कापतों *m.* मी कापत्यें *f.* मी कापतें *n.*	I cut.	आह्मी कापतों *m. f. n.* We cut.	
2.	तू कापतोस *m.* तू कापत्येस *f.* तू कापतेस *n.*	Thou cuttest.	तुह्मी कापतां *m. f. n.* You cut.	
3.	तो कापतो *m.* ती कापत्यें *f.* तें कापतें *n.*	He, she, it, cuts.	ते कापतात *m.* त्या कापतात *f.* तीं कापतात *n.*	They cut.

Past Tense.

	Sing.				
1. मी त्यां 2. तूं त्वां* 3. त्यानें *m. n.* तिनें *f.*		*m.*	*f.*	*n.*	I, thou, he, she, it.
	Sing. †	कापला.	कापली.	कापलें.	
Plu. 1. आह्मीं. 2. तुह्मीं. 3. त्यांनीं.	*Plu.*	कापले	कापल्या.	कापलीं.	We, you, they.

cut.

* In the past, 2nd person singular optionally takes स.

† In the present, past and future tenses, प before a long syllable is optionally changed to पि.

Digitized by Google

Future Tense.

	Singular.	*Plural.*
1.	मी कापीन *m. f. n.* I shall cut.	आह्मी कापूं. *m. f. n.* We shall cut.
2.	तू कापशील *m. f. n.* Thou wilt cut.	तुह्मी कापाल *m. f. n.* You will cut.
3.	तो *m.* / ती *f.* / तें *n.* कापील. He, she, it, will cut.	ते *m.* / त्या *f.* / तीं *n.* कापतील. They will cut.

Habitual Past Tense.

	Singular.	*Plural.*
1.	मी कापीं *m. f. n.* I used to cut.	आह्मी कापूं *m. f. n.* We used to cut.
2.	तू कापीस *m. f. n.* Thou usedest to cut.	तुह्मी कापा *m. f. n.* You used to cut.
3.	तो *m.* ती *f.* तें *n.* कापी He, she it, used to cut.	ते *m.* त्या *f.* तीं *n.* कापीत They used to cut.

Present Imperfect Tense.

	Singular.	*Plural.*
1.	मी कापीत-कापतों आहें *m.* / मी कापीत-कापत्यें आहें *f.* / मी कापीत-कापतें आहें *n.* I am cutting.	आह्मी कापीत-कापतों आहों *m. f. n.* We are cutting.
2.	तू कापीत-कापतो आहेस *m.* / तू कापीत-कापत्ये आहेस *f.* / तू कापीत-कापतें आहेस *n.* Thou art cutting.	तुह्मी कापीत-कापतां आहां *m. f. n.* You are cutting.
3.	तो कापीत-कापतो आहे *m.* / ती कापीत-कापत्ये आहे *f.* / तें कापीत-कापतें आहे *n.* He, she, it, is cutting.	ते कापीत-कापतात आहेत *m.* / त्या कापीत-कापतात आहेत *f.* / तीं कापीत-कापतात आहेत *n.* They are cutting.

Digitized by Google

Past Imperfect Tense.

	Singalar.		*Plural.*
1.	मी कापीत होतों *m.* मी कापीत होत्यें *f.* मी कापीत होतें *n.*	I was cutting.	आह्मी कापीत होतों *m. f. n.* We were cutting.
2.	तू कापीत होतास *m.* तू कापीत होतीस *f.* तू कापीत होतेंस *n.*	Thou wast cutting.	तुह्मी कापीत होतां *m. f. n.* You were cutting.
3.	तो कापीत होता *m.* ती कापीत होती *f.* तें कापीत होतें *n.*	He, she, it, was cutting.	ते कापीत होते *m.* त्या कापीत होत्या *f.* तीं कापीत होतीं *n.* They were cutting.

Future Imperfect Tense.

1. मी कापीत असेन *m. f. n.* I shall be cutting. — आह्मी कापीत असूं *m. f. n.* We shall be cutting.
2. तू कापीत असशील *m. f. n.* Thou wilt be cutting. — तुह्मी कापीत असाल *m. f. n.* You will be cutting.
3. तो *m.* ती *f.* तें *n.* कापीत असेल He, she, it, will be cutting. — ते *m.* त्या *f.* तीं *n.* कापीत असतील They will be cutting.

Present Perfect Tense.

		m.	*f.*	*n.*
1.	मीं त्यां *Sing.* तूं त्वां *Sing.*	*Sing.* कापला आहे.	कापली आहे.	कापलें आहे.
2.	त्यानें *m. n. Sing.* तिनें *f. Sing.*			
